# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
## कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर-४१६ ००४.

Office Phone Chairman- (0231) 2690829(O) 2690679 (R) Secretary -2691405 (O) 2656044 (R)
EPBX 2696101,102,103, Fax -2690758 E-mail divsec.kop@gmail.com

क्र.कोविम./माध्य परीक्षा/2055
कोल्हापूर.४१६००४.
दिनांक -२०/१२/२०२१

.प्रति,

मुख्याध्यापक,
सर्व माध्यमिक शाळा,
सातारा / सांगली / कोल्हापूर

**विषय :- सन २०२२ मध्ये घेण्यात येणाऱ्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षेची आवेदनपत्रे ऑनलाईन पध्दतीने सादर करणेसाठी मुदतवाढ देणेबाबत...**

सन २०२२ मध्ये घेण्यात येणाऱ्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षेची आवेदनपत्रे ऑनलाईन पध्दतीने सादर करावयाच्या तारखांच्या मुदतवाढीबाबतचे प्रकटन सोबत जोडलेले आहे. तरी त्यानुसार आपल्या माध्यमिक शाळेतील सर्व विद्यार्थ्यांचे आवेदनपत्रे ऑनलाईन पध्दतीने भरण्याची कार्यवाही करण्यात यावी.

(सुवर्णा शि.सावंत),
प्र.विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर

सोबत - राज्यमंडळ, पुणे यांचे दि.२०/१२/२०२१ प्रकटन

# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४११ ००४.

## ॥ प्र क ट न ॥

विषय-- सन २०२२ मध्ये घेण्यात येणाऱ्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षेची आवेदनपत्रे ऑनलाईन सादर करणेसाठी मुदतवाढ देणेबाबत.......

संदर्भ-- १)क.रा.मं./परीक्षा ३/६५८४ दि.१७/११/२०२१
२)क.रा.मं./परीक्षा ३/६८६१ दि.०८/१२/२०२१

उपरोक्त संदर्भीय विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांचेमार्फत सन २०२२ मध्ये घेण्यात येणाऱ्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षेच्या नियमित विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे SARAL Database वरुन ऑनलाईन पध्दतीने तसेच पुनर्परीक्षार्थी, नाव नोंदणी प्रमाणपत्र (Enrollment Certificate) प्राप्त झालेले खाजगी विद्यार्थी (Private Candidate), तसेच श्रेणी सुधार योजन अंतर्गत व तुरळक विषय घेवून, ITI (औद्योगिक प्रशिक्षण संस्थेव्दारे Transfer of Credit घेणारे विद्यार्थी) आवेदनपत्रे प्रचलीत पध्दतीप्रमाणे ऑनलाईन पध्दतीने दि.१२/११/२०२१ ते दि.२०/१२/२०२१ या कालावधीत व विलंब शुल्कासह दि.२१/१२/२०२१ ते दि.२८/१२/२०२१ या कालावधीत भरावयाची होती. परंतु आवेदनपत्रे भरताना माध्यमिक शाळांना तांत्रिक व इतर अडचणी येत असल्याचे निदर्शनास आले आहे. सबब सदर आवेदनपत्रे भरण्यास मुदतवाढ देण्यात येत असून सदर मुदतवाढीच्या तारखा खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आल्या आहेत.

सदर परीक्षेस प्रविष्ठ होऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांचे परीक्षेचे आवेदनपत्र ऑनलाईन पध्दतीने **www.mahahsscboard.in** या संकेतस्थळावर भरावयाची असून त्यांच्या तारखा व तपशील खालीलप्रमाणे

| शुल्क प्रकार | माध्यमिक शाळांनी नियमित विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे SARAL Database वरुन आणि पुनर्परीक्षार्थी, नाव नोंदणीप्रमाणपत्र (Enrollment Certificate) प्राप्त झालेले खाजगी विद्यार्थी (Private Candidate), श्रेणी सुधार व तुरळक विषय घेऊन परीक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांनी, ITI (औद्योगिक प्रशिक्षण संस्थेव्दारे Transfer of Credit घेणारे विद्यार्थी) आवेदनपत्रे प्रचलित पध्दतीप्रमाणे ऑनलाईन पध्दतीने भरावयाच्या मुदतवाढीच्या तारखा | माध्यमिक शाळांनी चलन DOWNLOAD करुन चलनाद्वारे बँकेत शुल्क भरावयाच्या तारखा |
|---|---|---|
| १ | २ | ४ |
| अ) नियमित शुल्कासह | गुरुवार दि. १८/११/२०२१ ते रविवार दि. २६/१२/२०२१ | गुरुवार दि.१८/११/२०२१ ते गुरुवार दि.०६/०१/२०२२ |
| ब) विलंब शुल्कासह | सोमवार दि. २७/१२/२०२१ ते शनिवार दि. ०१/०१/२०२२ | |

अ) आवेदनपत्रे भरावयाच्या कालावधीमध्ये माध्यमिक शाळांनी सर्व विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे भरुन सबमीट केल्यानंतर त्यांना शाळा Login मधून Pre-list उपलब्ध करुन दिलेली असेल शाळांनी त्याची प्रिंट काढून विद्यार्थ्यांमार्फत आवेदनपत्रातील नमूद केलेली जनरल रजिस्टरच्या माहितीनुसार पडताळून अचूक असल्याची खात्री करावी व

त्याबाबत Pre-list वर विद्यार्थ्यांची स्वाक्षरी घ्यावी. त्यानंतर सदर Pre-list चलनासोबत विभागीय मंडळात जमा करावी.

**ब) माध्यमिक शाळांनी विभागीय मंडळाकडे शुल्क भरल्याच्या चलनासह विद्यार्थ्यांच्या याद्या व Pre-list** जमा **करावयाची तारीख शुक्रवार दि.०७/०१/२०२२ राहील.**

इ.१०वी परीक्षेची आवेदनपत्रे ही ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्यात येणार असल्याने विद्यार्थ्यांनी आवेदनपत्रे त्यांच्या माध्यमिक शाळांमार्फत भरावी. सर्व माध्यमिक शाळातील मुख्याध्यापक यांनी ऑनलाईन आवेदनपत्रे भरण्यासाठी खालील महत्वाच्या बाबी विचारात घेणे आवश्यक आहे.

१. कोविड–१९ विषाणू प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर शासनाने व विशेषत: आरोग्य विभागाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या सर्व सूचनांचे व नियमांचे काटेकोरपणे पालन करण्याची दक्षता घेण्यात यावी.

२. शासन निर्णय क्र.गत्ह.१५१७/प्र.क्र.१९/संगणक दि.१४/०८/२०१७ नुसार माध्यमिक शाळांनी नियमीत विद्यार्थ्यांची ऑनलाईन आवेदनपत्रे स्विकारण्यासाठी Saral Database मध्ये विद्यार्थ्यांची अद्ययावत नोंद असणे आवश्यक आहे. सदर Saral Data वरुनच नियमीत विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे भरावयाची आहेत.

३. **पुनर्परिक्षार्थी, नाव नोंदणी प्रमाणपत्र** (Enrollment Certificate )प्राप्त झालेले खाजगी विद्यार्थी (Private Candidate),श्रेणी सुधार व तुरळक विषय घेऊन, ITI (औद्योगिक प्रशिक्षण संस्थेव्दारे Transfer of Credit घेणारे विद्यार्थी)आवेदनपत्रे प्रचलित पध्दतीप्रमाणे ऑनलाईन पध्दतीने परीक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांची माहिती Saral Data मध्ये नसल्याने सदर विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे प्रचलित पध्दतीने ऑनलाईनच भरावयाची आहेत. त्याच्या तारखा वरीलप्रमाणे निश्चित करण्यात आल्या आहेत.

४. कौशल्य सेतु अभियानाचे Transfer of Credit मागणाऱ्या विद्यार्थ्यांनी देखील online पध्दतीने आवेदनपत्र भरुन विषयासमोर Transfer of Credit ची नोंद करावी. याशिवाय संबंधित विद्यार्थ्यांनी प्रचलीत पध्दतीने आवेदनपत्र व आवश्यक कागदपत्रे यांची हार्डकॉपी (Hard Copy) विभागीय मंडळात जमा करावी.

५. पुणे, औरंगाबाद, व कोल्हापूर विभागीय मंडळातील माध्यमिक शाळांनी प्रचलीत परीक्षा शुल्क बँक ऑफ इंडियाच्या चलनावरील नमूद मंडळाच्या Virtual Account मध्ये जमा करुन चलनाची प्रत व Pre-list दिलेल्या मुदतीतच विभागीय मंडळाकडे सादर कराव्यात.

६. मुंबई, नागपूर व लातूर विभागीय मंडळाच्या कक्षेतील माध्यमिक शाळांनी प्रचलीत परीक्षा शुल्क एच.डी.एफ.सी. (HDFC Bank) बँकेच्या चलनावरील नमूद मंडळाच्या Virtual Account मध्ये जमा करुन चलनाची प्रत व Pre-list दिलेल्या मुदतीतच विभागीय मंडळाकडे सादर कराव्यात.

७. अमरावती, नाशिक व कोकण विभागीय मंडळातील माध्यमिक शाळांनी प्रचलीत परीक्षा शुल्क ॲक्सिस (AXIS Bank) बँकेच्या चलनावरील नमूद मंडळाच्या Virtual Account मध्ये जमा करुन चलनाची प्रत व Pre-list दिलेल्या मुदतीतच विभागीय मंडळाकडे सादर कराव्यात.

८. आवेदनपत्रे सादर केलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे शुल्क चलनाद्वारेच भरण्यात यावे. सर्व माध्यमिक शाळांनी

गतवर्षीप्रमाणेच परीक्षा शुल्क संगणकीय चलन Download करुन चलनावरील नमूदप्रमाणे मंडळाच्या Virtual Account मध्ये NEFT/RTGS व्दारे वर्ग करावयाचे आहे. माध्यमिक शाळांनी NEFT/RTGS व्दारे वर्ग केलेली रक्कम त्यांच्या बँक खात्यातून प्रत्यक्ष वजा झाली आहे किंवा नाही तसेच Account Number व IFSC Code चूकीचा नमूद केला गेल्यास सदरची रक्कम परत त्यांच्या खात्यात जमा झाला नसल्याची खातरजमा करण्याची जबाबदारी संबंधित मुख्याध्यापक यांची राहील.

९. माध्यमिक शाळांनी सादर केलेल्या सर्व आवेदनपत्रांचे विहित शुल्क भरल्याशिवाय संबंधितांचे प्रवेशपत्रे उपलब्ध करुन दिली जाणार नाहीत. सदर बाब सर्व माध्यमिक शाळांच्या निदर्शनास आणून दयावी. माध्यमिक शाळांनी उपरोक्तप्रमाणे परिपूर्ण व अचूक शुल्क भरल्याची खातरजमा विभागीय मंडळ स्तरावर करुन त्याबाबतचा अहवाल गणकयंत्र विभागाच्या नमुन्यात राज्यमंडळ कार्यालयास सादर केल्यानंतर संबंधित माध्यमिक शाळांना विद्यार्थ्यांची प्रवेशपत्रे ऑनलाईन पध्दतीने उपलब्ध करुन देण्यात येतील.

१०. नियमित शुल्कासह तसेच विलंब शुल्कासह आवेदनपत्रे सादर केलेल्या विद्यार्थ्यांचे शुल्क दोन स्वतंत्र चलनाव्दारेच भरण्यात यावे.

११. सन २०२२ मधील परीक्षेसाठी, सन २०२१ अथवा सप्टेंबर–ऑक्टोबर २०२१ मधील परीक्षेमध्ये एकाच वेळी सर्व विषय घेवून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनाच श्रेणीसुधार योजनेतंर्गत आवेदनपत्र भरुन परीक्षेस प्रविष्ट होता येणार आहे.त्यामुळे त्यापूर्वीचे असे उत्तीर्ण विद्यार्थी अथवा कोणताही पुनर्परीक्षार्थी श्रेणी सुधार योजनेतंर्गत परीक्षेस प्रविष्ट होणार नाही याबाबतच्या सर्व स्पष्ट सूचना विभागीय मंडळ स्तरावरुन माध्यमिक शाळांना देण्यात याव्यात.

१२. औद्योगिक प्रशिक्षण संस्थेव्दारे Transfer of Credit घेवू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी उपरोक्त कालावधीमध्ये संबंधित प्रशिक्षण संस्थेव्दारे ऑनलाईन आवेदनपत्र भरणे आवश्यक आहे

१३. उपरोक्त आवेदनपत्रे भरण्याच्या मुदत वाढीनंतर पुन:श्च मुदतवाढ देण्यात येणार नाही याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

(डॉ.अशोक भोसले)
सचिव,
राज्य मंडळ, पुणे–०४.

दिनांक : १६/१२/२०२१.